सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

गृहव्यवस्थापन विभाग

जावक क्रमांक : गृव्य./ऑनलाइन-शुद्धीपत्रक-२/२०२६/१३४५ **दिनांक : ०३/११/२०२६**

शुद्धीपत्रक क्रमांक ०२

ई-निविदा दुसरी मुदतवाढ सूचना

संदर्भ :

१. दैनिक वृत्तपत्र जाहिरात क्रमांक ३१, प्रसिद्धी दिनांक ११ ऑक्टोबर २०२६

२. विद्यापीठ मूळ ई-निविदा सूचना दिनांक ११ ऑक्टोबर २०२६

३. शुद्धीपत्रक क्रमांक ०१ जावक क्र. गृव्य./ऑनलाइन-शुद्धीपत्रक/२०२६/१३००, दिनांक २७/१०/२०२६

४. संबंधित ई-निविदा आस्थापना :

- मध्यवर्ती भोजनगृह (रिफेक्टरी)
- मुलांचे वसतिगृह क्रमांक ०८ येथील भोजनगृह
- बीबीए भोजनगृह (तळमजला)
- फूड स्टॉल क्रमांक ०५, ०६ व ०८

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ परिसरातील उपरोक्त सर्व भोजनगृहे आणि फूड स्टॉल्स चालविण्यासाठी परवाना देण्याकरिता प्रसिद्ध करण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेस प्राप्त आदेशानुसार व प्रशासकीय कारणास्तव दिनांक १६ नोव्हेंबर २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. त्यानुसार सुधारित वेळापत्रक खालीलप्रमाणे राहील :

अ.क्र	निविदा टप्पा / तपशील	मागील मुदत	**सुधारित मुदत (२ री मुदतवाढ)**
१	निविदा डाऊनलोड समाप्त तारीख	०३/११/२०२६ (दुपारी १५:०० वा.)	**१६/११/२०२६ (दुपारी १५:०० वाजेपर्यंत)**
२	ऑनलाइन ई-निविदा सादर अंतिम तारीख	०३/११/२०२६ (दुपारी १५:०० वा.)	**१६/११/२०२६ (दुपारी १५:०० वाजेपर्यंत)**
३	तांत्रिक निविदा उघडण्याची तारीख व वेळ	०४/११/२०२६ (दुपारी १५:०० वा.)	**१८/११/२०२६ (दुपारी १५:०० वाजता) (शक्य झाल्यास)**
४	आर्थिक निविदा उघडण्याची तारीख व वेळ	नंतर कळविण्यात येईल	तांत्रिक छाननीनंतर पोर्टलद्वारे

महत्त्वाच्या सूचना (निविदाकारांसाठी) :

१. ज्या निविदाकारांनी यापूर्वीच आपली ई-निविदा यशस्वीरीत्या सादर केली आहे, त्यांची निविदा सुरक्षित व ग्राह्य धरण्यात येईल. आवश्यक असल्यास मुदतीपूर्वी सुधारित निविदा सादर करता येईल.

२. मूळ ई-निविदा दस्तऐवजातील इतर सर्व अटी, शर्ती, पात्रता निकष व अनामत रक्कम पूर्ववत कायम राहतील.

३. (सदर दस्तऐवज ऑनलाइन प्रणालीद्वारे प्रमाणित असल्याने यावर प्रत्यक्ष स्वाक्षरीची आवश्यकता नाही.)

उपकुलसचिव